जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३६९ दिनांक - १७/०५/२०२३**

## सायबर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## शेअर मार्केटमध्ये चांगला परतावा देण्याचे नावाखाली लाखोंची फसवणूक करणा-या आंतरराज्य टोळीतील राजस्थानचा आरोपी जेरबंद केले बाबत

संपूर्ण जग करोना काळामध्ये लॉकडाऊनमुळे आर्थिक अडचणीमध्ये असताना, सर्वसामान्य नोकरदारांचे नोकरीवर गंडातंर आल्यामुळे तसेच करोना काळामध्ये पैसे कमविण्यासाठी घरबसल्या शेअर मार्केटमध्ये पैसे लावून त्याव्दारे पैसे कमविण्याकडे सर्वसामान्य जनतेचा जास्त कल झाला आहे. याच गोष्टीचा फायदा घेवून राजस्थानमधील सायबर गुन्हयांची पंढरी समजल्या जाणा-या अलवर जिल्हा मधील आरोपी मिलन जिनेंद्र जैन रा. केदलगंज वर्कशॉप, अल्वर राजस्थान, ३०१००१याने सन २०२० मध्ये शेअर मार्केटबाबत युटयूब चॅनल https://youtube.com/@milanjain चालू करुन त्याव्दारे सुरवातीला सर्वसामान्य लोकांना शेअरमार्केटचे धडे देवून व शेअर मार्केटमध्ये पैसा कसा कमवायचा याबाबत सांगून त्याचे सबस्क्रायबर वाढविले.

आरोपी मिलन जैन याचे तब्बल ४० हजार सबस्क्रायबर झाल्यानंतर लोकांना शेअरमार्केटमध्ये त्याची कंपनी ट्रेडिंग विंथ ए प्रो या कंपनीच्या माध्यमातून त्याचेकडे शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्यास मोठया प्रमाणात नफा मिळवून देतो असे सांगून, पुण्यामधील गुंतवणूकदार याची सुमारे २५ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केली आहे. सिंहगड रोड येथे राहणारे फिर्यादी यांची फसवणूक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्याने गुन्हा नोद आहे.

फिर्यादी यांनी आरोपीचे युटयूब चॅनल सबस्क्राईब केल्यानंतर त्यांचे मोबाईलवरुन संपर्क होवून सुरुवातीला काही रक्कम गुंतवल्यानंतर चांगला परतावा देवून आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादी यांनी आरोपीकडे वेळोवेळी तब्बल २५ लाख रुपये ट्रेडिंग विंथ ए प्रो या कंपनीच्या ॲक्सीस बँकेच्या खात्यावर पाठवून गुंतवणूक केली. त्यानंतर काही दिवसांनी शेअर मार्केटमध्ये तोटा झाला आहे असे सांगून, आरोपीने फिर्यादी यांची फसवणूक केली. आरोपीने फिर्यादी यांचेबरोबर महाराष्ट्र सह इतर राज्यातील लोकांची देखील लाखो रुपयांची फसवणूक केली आहे. आरोपी मिलन जैन याचे विरुध्द रबाळे पोलीस ठाणे नवी मुंबई येथे देखील फसवणूकीचा व एमपीआयडी कायदा अन्वये गुन्हा नोंद असून, रबाळे पोलीसांनी आरोपीला राजस्थान येथून अटक केली होती. सदर आरोपी हा पुणे सायबर पोलीसांना पाहिजे असल्याने आरोपीचे अटक वॉरंट घेवून बेलापूर कोर्टाकडून आरोपीचा ताबा घेवून त्यास तळोजा जेल येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आलेली आहे. आरोपीला मा. कोर्टामध्ये हजर केले असता, मा.न्यायालयाने आरोपीस दि. २२/०५/२०२३ पर्यत पोलीस कस्टडी रिमांड दिलेली असून, अधिक तपास पोलीस उपनिरिक्षक अनिल डफळ हे करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, श्री. रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री. संदिप कर्णीक, मा.अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,श्री. रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, श्री.श्रीनिवास घाडगे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, श्री.विजयकुमार पळसुले, व.पो.नि. श्रीमती मिनल सुपे-पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक अनिल डफळ, पोलीस अंमलदार शिरीष गावडे, नवनाथ कोंडे, किरण जमदाडे, सुनिल सोनुने या पोलीस पथकाने यशस्वी रित्या पार पाडली. **अशा प्रकारे शेअर मार्केटमध्ये चांगला परतावा देण्याचा बहाणा करुन फसवणूक करणारे गुन्हेगारांपासुन सावध राहण्याबाबत सायबर पोलीस स्टेशन, शिवाजीनगर, पुणे यांचेकडुन आवाहन करण्यात येत आहे.**